**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – राहूल गुरुनाथ घाडी

माझे वय – १६ वर्षे,

व्यवसाय – शिक्षण

रा. – नारिंग्रे–जोगलवाडी, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.जाधव यांचे मार्फत.**

०१. माझ्यासोबत माझ्या घरी माझे आई वडील,आजी, भाऊ असे एकत्रीत राहतो. माझे मामाचे गाव कुडोपी हे आहे. आम्ही मामाचे गावाला जातो. दि. २९/०९/२०२३ रोजी आम्ही कुडोपी येथे गेलो होतो. आजोबांचा म्हाळ श्राध्द असल्याने आम्ही कुडोपी येथे गेलो होतो. माझ्यासोबत माझे बाबा होते. आम्ही आमच्या स्वतःच्या मोटरसायकल क्र. एमएच–०७–वाय–१६२८ ने गेलो होतो. कार्यक्रम झाल्यानंतर आम्ही त्याच दिवशी माघारी आलो. आम्ही घरी येण्यासाठी २.३० वा.च्या दरम्यान निघालो होतो. गाडी माझे बाबा चालवत होते. समोरुन वाहन आले आणि आम्हाला धडक दिली. धडक लागल्यामुळे आम्ही खाली पडलो. माझा उजवा पाय तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाला, माझ्या चेहऱ्यावर व खांदयावर जखम झाली. बाबाचे उजवा पायावर गंभीर जखम झाली. पाठीमागून माझा मामा संतोष घाडी आला. मामांनी आम्हाला डॉ. पाकळे कणकवली यांच्याकडे औषधोपचारासाठी नेले. ज्यांनी वाहन चालकाने आम्हाला धडक दिली त्याचे नाव मी सांगू शकतो. त्याचे नाव राजेश वाळवे असे आहे. त्यांना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज तो न्यायालयात हजर आहे. अपघाताची तक्रार माझ्या बाबानी पोलीस स्टेशनला दिली.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.**

०२. सरतपासामध्ये सांगितलेला मजकूर मी पोलीसांना दुसऱ्या दिवशी

हॉस्पीटलमध्ये सांगितला होता. पोलीसांना मी माझा जबाब दिल्यानंतर ते पोलीसांनी लिहून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब नोंदविल्यानंतर पोलीसांचा आणि माझा काही संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजोबांचा म्हाळ श्राध्द हा दुःखाचा कार्यक्रम होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गाडीवर तिघेजण होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघात हा आचरा कुडोपी रस्त्यावर डाव्या बाजूला घडला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा आचऱ्याकडून कुडोपीकडे जाता होता तसेच आम्ही कुडोपीकडून आचरा येथे जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या ठिकाणी वळण आहे. हे म्हणणे खरे नाही की, बाबा गाडी चालवत असताना कार्यक्रमाबद्दल माझी व त्यांची चर्चा सुरु होती. हे म्हणणे खरे नाही की, लवकर घरी जाण्यासाठी माझे वडील वेगाने गाडी चालवत होते. हे म्हणणे खरे नाही की, बाबाना गाडी कंट्रोल न झाल्याने ते आरोपीच्या गाडीला जावून धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बाबांच्या गाडीचा आरसा आरोपीच्या गाडीच्या आरशाला धडकला. हे म्हणणे खरे नाही की, आरसा धडकल्यानंतर माझे बाबांचा गाडीवरील ताबा गेल्याने ते पुढे जावून रस्त्यावर पडले. हे म्हणणे खरे नाही की, बाबांचा बॅलन्स गेल्याने आम्ही रस्त्यावर पडलो व मला व माझ्या बाबांना दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझे बाबा रस्त्याच्या विशिष्ठ परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वेगाने गाडी चालविल्याने अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझे बाबा वेगाने गाडी चालवून अपघात झाल्याने आम्हाला दुखापती झाल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघात झाल्यानंतर जसे लोकांनी आम्हाला सांगितले त्याप्रमाणे माझे वडीलांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, बाबाविरुध्द कोणतीही कारवाई होवू नये म्हणून बाबांनी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. मी आज जबाब देण्यापुर्वी माझा पोलीसांना दिलेला जबाब दोन ते तीन वेळा वाचून खात्री केली. मी त्याप्रमाणे साक्ष दिली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, जे खरे आहे ते मी सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जे कागदामध्ये लिहिलेले आहे ते मी सांगत आहे, परंतु जी खरी वस्तुस्थिती आहे ती सांगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दुसऱ्या दिवशी आमचा जबाब नोंदविला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आमचा जबाब नोंदविला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडीचा क्रमांक चुकीचा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,

पोलीसांनी आमचा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी जोडलेल्या खोटया जबाबाच्या आधारे मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २९/०७/२०२५

एम.के.फकीह
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.